**पुणे महानगरपालिका**

**महिला व बाल कल्याण समिती**

**कार्यपत्रिका क्र. २०**

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार, दिनांक ७/२/२०१८ रोजी दुपारी ३=३० (साडे तीन ) वा. महात्मा ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्र. १८४**

**मा. शंकर पवार यांचे दि. २५ .१. २०१८ चे पत्र**

प्रभाग क्र.३० ( दत्तवाडी –जनता वसाहत ) येथील जनता वसाहत गल्ली क्र.६३/६४ येथील अस्तित्वातील शौचालयाची पहाणी करता वेळेस सदरचे शौचालयाचे बांधकाम अत्यंत नादुरुस्त अवस्थेत निदर्शनास आले आह. सदरे शौचालयाचा वापर करत असताना बांधकाम ढासळून मोठी जीवितहानी / दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही .तरी सदरचे शौचालय पाडून लोकांची गैरसोय होऊ नये या करणास्तव सदर ठिकाणी नवीन शौचालय बांधणे गरजेचे आहे.

सबब सदर ठिकाणी अस्तित्वातील नादुरुस्त शौचालय पाडून नवीन शौचालय बांधून मिळावे .

**विषय क्र. १८५**

**मा. सौ.संगिता ठोसर व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. २९ .१. २०१८ चे पत्र**

सौ.मिलन गुरव, राहणार वानवडी पुणे ४० या पुणे महानगरपालिकेमध्ये काम करीत असून त्या दुरदर्शनवरील अनेक कार्यक्रमात सुत्रसंचलन व निवेदक म्हणून सहभागी होत असतात.

सौ.मिलन गुरव यांनी देशपातळीवरील मिसेस इंडिया ऑफ नेशन या स्पर्धेमध्ये मोस्ट टॅलेंटेड अवॉर्ड व मोस्ट ब्युटीफुल हेअर अवॉर्ड हे पुरस्कार मिळविलेले आहेत .

त्यामुळे पुणे शहराच्या नावलौकीकामध्ये मोलाची भर पडली असल्याने सौ.मिनल गुरव यांनी मिळविलेल्या पुरस्काराकरिता सौ. मिलन गुरव यांचे महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे .

**विषय क्र. १८६**

**मा. सौ.लक्ष्मी आंदेकर यांचे दि. ३०.१. २०१८ चे पत्र**

प्रभाग क्र. १७ मधील डोके तालीम,नाना पेठ याठिकाणी महानगरपालिके मार्फत राजलक्ष्मी बचत गटाच्या माध्यमातून योगकेंद्र व शिवण क्लास चालू आहेत . याठिकाणी ब्युटीपार्लर कोर्स सुरु करावा अशी या भागातील महिलांची मागणी आहे. तसेच याठिकाणी पुरेशी जागा उपलब्ध असल्याने ब्युटीपार्लर कोर्स सुरु करणे शक्य आहे .

तरी प्रभाग क्र. १७ मधील डोके तालीम,नाना पेठ याठिकाणी महानगरपालिकेतर्फे योगकेंद्र व शिवण क्लास सह ब्युटीपार्लर कोर्स सुरु करावा .

**विषय क्र. १८७**

**मा. अमोल बालवडकर यांचे दि. ३१.१. २०१८ चे पत्र**

प्रभाग क्र.९ बाणेर – बालेवाडी येथे गेली अनेक वर्षापासून या भागातील नागरिकांसाठी कोणत्याही प्रकारचा मनपाचा दवाखाना उपलब्ध नसल्याने या भागातील नागरिकांसाठी बाणेर येथील स.नं.११४ येथे बांधण्यात आलेले महिला बचत गट व बहुउद्देशिय केंद्र येथे पुणे मनपाचा दवाखाना ( ओ.पी.डी. OPD ) सुरु करावा .

**विषय क्र. १८८**

शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेचे सभासदत्वासाठी मा.तहसीलदार कार्यालयाकडील र.रु.१ लाखा पर्यंतच्या उत्पन दाखल्याऐवजी संबंधित कुटूंबांचे उत्पन्न र.रु.१ लाख पर्यंत असलेले पिवळे अथवा केशरी रेशनिंग कार्ड सादर केल्यावर सभासदत्व देणेबाबत मा.युवराज बेलदरे यांचे दि.२९.९.२०१७ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र. १४०, दिनांक २५.१०.२०१७ ला अनुसरुन मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आरोग्य/९२४, दि.३०.१.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी .

<u>विषय क्र. १८९</u>

**<u>मा .विजय शेवाळे यांचे दि. ११.१.२०१८ चे पत्र.</u>**

मौजे बापोडी गांधीनगर येथील झोपडीधारकाच्या पुनर्वसन प्रक्रियेसाठी झोपडपट्टीतील सार्वजनिक शौचालय काढणे बाबत मौजे बापोडी येथील जुन्या हॅरीस पुलालगत समांतर नवीन पुलाचे विस्तारकरणाचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बीआरटीएस विभागामार्फत सुरु आहे. सदर समांतर पुलाच्या विस्तारकरणामध्ये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील बापोडी,गांधीनगर येथील झोपडपट्टीतील काही झोपड्या रुंदीकरणामध्ये बाधित होत असून सदर ठिकाणच्या समांतर पुलाच्या पोहोच रस्त्यामध्ये येणाऱ्या झोपड्या त्वरीत निष्कासीत करुन झोपडी धारकांचे पुर्नवसन करणेस मा. महापालिका आयुक्त यांनी संदर्भांकित ठरावान्वये मान्यता दिली आहे?

विषयांकित ठिकाणी २ सार्वजनिक शौचालये असून सदर शौचालयाचा काही भाग रस्ता रुंदीकरणांमध्ये व पुर्नवसन प्रक्रियेमध्ये येत असल्याने सदर सार्वजनिक शौचालय काढणे आवश्यक आहे.

तरी, विषयांकित ठिकाणची २ सार्वजनिक शौचालय पाडणेसाठी मा. महिला बालकल्याण समितीची मान्यता मिळणेस विनंती आहे.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

<u>विषय क्र. १९०</u>

**<u>मा. अजय खेडेकर आणि मा. योगेश समेळ यांचे दि. १६.१.२०१८ चे पत्र.</u>**

पुणे महानगरपालिकेच्या माजी सभासदांना पुणे मनपा तर्फे अंशदायी वैद्यकिय सहाय्य योजनेचा लाभ देण्यात येतो. अंशदायी सहाय्य योजनेअंतर्गत माजी. मा. सभासदांना व त्यांच्या पती/पत्नीला रुग्णालयामध्ये दाखल करावयाच्या वेळेस त्यांना सध्या १००% हमीपत्र जनरल वॉर्डचे देय आहे. तरी, यापुढे मा.सभासदांना सेमी प्रायव्हेट रुमची सोय अंशदायी वैद्यकिय सहाय्य योजनेअंतर्गत मिळावी व तसेच मा. सभासदांच्या मुलांना सुध्दा या योजनेअंतर्गत समाविष्ट करुन घेण्यात यावे.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

<u>विषय क्र. १९१</u>

त्वचारोग तज्ञ,एडस,नोडल ऑफिसर,मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, कार्डिओलॉजिस्ट/ हृदयरोग तज्ञ, न्यायवैद्यकशास्त्र / वैद्यकीय अधिकारी (न्यायवैद्यकशास्त्र), नेत्र शल्यचिकित्सक / नेत्रतज्ञ, रक्तसंक्रमण अधिकारी (वर्ग १) (वेतनश्रेणी-१५६००-३९१००+ग्रेड पे ६६००) या पदावरील नेमणूकीबाबतचे मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ उआ(साप्र) आस्था/ ७९३, दि. ९/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

<u>विषय क्र. १९२</u>

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),२८ क्वीन्स गार्डन, जुन्या सर्कीट हाऊसजवळ, पुणे ४११००१ यांचे संयुक्त सहकार्याने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबतचे मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ स.वि.वि./८२८, दिनांक १६/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

<u>विषय क्र. १९३</u>

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व मिटकॉन सेंटर फॉर सीएसआर ॲण्ड स्किल डेव्हलपमेंट, शिवाजीनगर, पुणे यांचे संयुक्त सहकार्याने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबतचे मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/स.वि.वि./८३०, दिनांक १६/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

<u>विषय क्र. १९४</u>

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (SNDT ) निरंतर व प्रौढ शिक्षण व विस्तार विभाग, पुणे उपकेंद्र कर्वे, पुणे ३८ यांचे संयुक्त सहकार्याने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आयोजित करणे बाबतचे मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/स.वि.वि./८३७, दिनांक १६/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**